असा. क्र. ४६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, मे १३, १९९७/वैशाख २३, शके १९१९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.—महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम. .. .. .. .. | ४८०–४८२ |

दिनांक ९ मे १९९७ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिभा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.**

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १३ मे १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७१ चा महा. ४७. आणि **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्या-

१९९७ चा महा. अध्या. ९. बद्दल त्यांची खात्री झाली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २५ फेब्रुवारी १९९७ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, १९९७ हा प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अधिनियम, १९९७ असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३० जून १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याचे कलम १, पोट-कलम (४) मध्ये "१९९६" या आकड्यांऐवजी "१९९८" हे आकडे दाखल करण्यात येतील. (१९७१ चा महा. ४७.)

व्यावृत्ती. ३. कोणत्याही व्यक्तीने १ जुलै १९९६ रोजी सुरू होणाऱ्या आणि दिनांक २४ फेब्रुवारी १९९७ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्या बाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९६ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे, त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९९८ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

१९९७ चा महा. अध्या. ९ ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (करण्यात आलेली कोणतीही नियुक्ती किंवा काढण्यात आलेला कोणताही नियम, आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तद्नुरूप तरतुदीअन्वये यथास्थिति, करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही, करण्यात आलेली नियुक्ती, किंवा काढण्यात आलेला नियम, आदेश किंवा अधिसूचना असल्याचें मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.